महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा
आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नाशिक

| | |
|---|---|
| दुरध्वनी- ०२५३-२३११२०१ /२५७५१०८<br>ई-मेल- hfwtcnsk1@gmail.com / hfwtcnsk@gmail.com | जिल्हा रुग्णालय नाशिक आवार, नविन सीबीएस जवळ, त्र्यंबकरोड, नाशिक |
| जा. क्र.आवकुकप्रकेना/ आहारसेवा/1078/२०२५ | दिनांक- २२/०९/२०२५ |


# जाहिर नोटीस (दरपत्रक आमंत्रण पत्र)
# "कंत्राटी आहार सेवा"

प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक येथे प्रशिक्षणासाठी येणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांना भोजन पुरविण्याचा करिता दरपत्रके मागविण्यात येत आहे. इच्छूक पुरवठाधारकांनी व्यापारी लिफाफा खालील दिलेल्या अटी शर्तीचे अवलोकन करुन दरपत्रके विहित कालावधीत प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नाशिक, जिल्हा रुग्णालय नाशिक आवार, येथे मोहरबंद व्यापारी लिफाफा स्वतंत्र सादर करावे. स्थानिक दरपत्रकधारकांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

**- कागदपत्रक -**

## लिफाफा क्रं.१ तांत्रिक

१) संस्था असल्यास रजिस्ट्रेशन प्रमाणपत्राची प्रत आवश्यक आहे.

२) उपहारगृह चालविणेबाबत अन्न व औषधे प्रशासनाचे प्रमाणपत्र.

३) भोजन ठेका चालविण्याचे व्यवसाय नोंदणी प्रमाणपत्र (शॉप ॲक्ट) जोडणे आवश्यक.

४) G.S.T. Certificate(निविदेच्या तारखेपर्यंत ग्राहय असलेले) व वैध पॅन कार्ड झेरॉक्स जोडणे आवश्यक.

५) मागील तीन वर्षांचे प्राप्ती कर (Income tax)भरल्याचा दाखला.(सन २०२२-२०२३, सन २०२३-२०२४, सन२०२४-२०२५) (Income Tax Clearance Certificate) आवश्यक.

६) फॉर्म मधील परिशिष्ट क्रमांक-१ जोडणे आवश्यक.

७) संस्थेची आर्थिक स्थिती मागील तीन वर्षाच्या उलाढाल सनदी लेखापाल यांच्या कडून परिशिष्ट क्रमांक २ या प्रमाणे माहीती सादर करणे.

८) गेल्या तीन वर्षात शासकीय/निमशासकीय/खाजगी कार्यालय आहार सेवा कामाचे अनुभव प्रमाणपत्र असल्यास जोडावे व परिशिष्ट क्रमांक३ प्रमाणे सादर करावीत.

९) संस्थेकडे असलेल्या मनुष्यबळाचा तपशिल जोडणे.

१०) पुरवठाधारकास शासनाच्या कोणत्याही विभागामार्फत काळया यादीत टाकलेले नाही, या बाबत परिशिष्ट क्रमांक-४ चे रुपये १००/- बॉन्ड पेपरवर ॲफिडेव्हिट करुन सादर करणे आवश्यक आहे.

११) परिशिष्ट क्रमांक-५ नुसार पुरवठा धारकाची माहीती भरणे आवश्यक आहे.

१२) राज्य कामगार विमा योजना नोंदणी प्रमाणपत्र हे अधिनियम कलम १(५)नुसार ही योजना २० किंवा त्यापेक्षा जास्त कामगार असणाऱ्या दुकाने, हॉटेल, उपहारगृहे आस्थापनांना लागू करण्यात आली आहे त्यांना प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

१३) भविष्य निर्वाह निधी नोंदणी प्रमाणपत्र हे ज्या संस्थेत २० किंवा त्यापेक्षा जास्त कर्मचारी असेल अशा संस्थांना प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

१४) मागील एक वर्षाचे PTX चलन भरल्याची प्रत जोडावे किंवा PTX Clearance Certificate जोडावे.

टिपः- लिफाफा क्रमांक-१ मुळ तांत्रिक कागदपत्रामध्ये तफावत आढळल्यास दरपत्रक रद्द करण्याचा अधिकार प्राचार्य यांना राहील यांची नोंद घ्यावे.

# अटी व शर्ती

१) दरपत्रक धारकाचे पदार्थांचे दर सर्व करासह नमुद करावे.तसेच सर्व पदार्थांचे दर भरणे आवश्यक आहे.

२) स्थानिक दरपत्रकधारकांना प्रथम प्राधान्य देण्यात येईल.

३) एका पुरवठाधारकास बाबनिहाय फक्त एक दरपत्रक सादर करण्याची मुभा आहे. कोणत्याही व्यक्ती किंवा संस्थेला दरपत्रक प्रक्रियेमध्ये भाग घेणाऱ्या अन्य संस्थेमध्ये थेट स्वारस्य असू नये. असे थेट स्वारस्य असल्यास तो हितसंबधाचा संघर्ष म्हणून समजण्यात येईल व परिणामी दोन्ही किंवा अधिक दरपत्रक नाकारण्यात येतील. उदा.जर दोन कंपन्या एकाच बाबीसाठी/प्रकल्पासाठी/दरपत्रक सादर करणार असतील तर एक व्यक्तीजी "कंपनी एक्स" चा मालक/ संचालक/ भागिदार/ बहुसंख्य भागधारक असेल तीच व्यक्ती "कंपनी वाय" चा मालक/ संचालक/ भागिदार/ बहुसंख्य भागधारक नसावी.

४) कोणतेही कारण न दाखविता दरपत्रक स्विकारण्याचा/ नाकारण्याचा, तसेच दरपत्रक प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर दरपत्रक रद्द करण्याचा अधिकार, निविदेतील अटी व शर्ती शिथिल करण्याचा अधिकार मा.प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक यांनी राखुन ठेवले आहे.

५) दरपत्रक स्विकारल्यानंतर भोजनालय सुरु करण्याचे कार्यालयीन आदेश प्राप्त झाल्यावर त्वरीत आहार सेवेचा पुरवठा करावा लागेल.

६) काही तांत्रिक बाबी किंवा जेवणाविषयी तक्रारी प्राप्त झाल्यास आहर सेवेचा कंत्राट बंद करण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील.

७) या कार्यालयात येणारे अधिकारी/कर्मचारी यांना प्रथम प्राधान्य राहील. आरोग्य विभागातील इतर अधिकारी व कर्मचारी यांना उपहारगृहात भोजन करण्याची परवानगी राहील. परंतु बाहेरील व्यक्तींना परवानगी राहणार नाही.

८) उपहारगृहात मद्यपान व धुम्रपान करण्यास सक्त मनाई राहील. तसे गैरवर्तन आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

९) दरपत्रके स्विकारण्याची मुदत प्रसिध्दी दिनांका पासून कार्यालयीन सुट्टी चे दिवस वगळून पाच दिवसात (दि. २९/०९/२०२५ पर्यंत) संध्याकाळी ५.०० वाजेपर्यंत असेल.उशिरा प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार केला जाणार नाही.

१०) दरपत्रके उघडण्याची दि.३०/०९/२०२५ सकाळी ११.३०वा किंवा या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द केली जाईल.

११) प्रशिक्षणार्थी सत्रात सकाळी/रात्री प्रत्यक्ष भोजन घेतील त्यानुसार देयक अदा केले जातील.

१२) भोजन सुविधा पुरविणेसाठी प्रशिक्षण केंद्राचे उपहारगृह पुरवठा आदेश देणेचे वेळेस जागा उपलब्ध असल्यास पुरविण्यात येईल त्या जागेचे सार्वजनिक बांधकाम विभाग,नाशिक यांचे कडून दर मागविण्यात येतील त्यानुसार जागेची मासिक भाडयाची रक्कम किंवा मासिक भाडे रु.५०००/- (पांच हजार रुपये) यापैकी जी रक्कम जास्त असले ती रक्कम आकारण्यात येईल. तसेच मासिक भाडे दरमहा ५ तारखेपर्यंत अदा करावे लागेल. अन्यथा आपल्या आहार देयकातून सदर भाडे दंडा सह वसूल करण्यात येईल.

१३) पाकगृहासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करुन न दिल्यास जेवन तयार करुन आणणे, प्रशिक्षणार्थींना वाढणे व जेवलेली ताटे त्याच दिवशी घेवून जाण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहिल.

१४) अपरिहार्य कारणास्तव जेवण वाढण्याकरिता डिस्पोजल प्लेटचा वापर केल्यास त्याची विल्हेवाट लावण्याची जाबाबदारी कंत्राटदाराची राहिल. त्याबाबत महानगर पालिकेकडून दंड आकारल्यास भरणाकरण्याची जाबादारी कंत्राटदाराची असेल.

१५) उपहारगृहात काम करणाऱ्या कामगार वर्गाचे पोशाख एकसमान, निटनेटके तथा स्वच्छ असणे बंधनकारक राहील. १८ वर्षावरील कामगारांनाच कामासाठी नियुक्त करावे.

१६) उपहारगृहात नेमण्यात आलेला कामगार वर्गाची नावांची यादी, पत्ता, आधारकार्ड, किमान वेतन आणि फोटो इत्यादी अभिलेख कार्यालयांत सादर करणे अनिवार्य आहे. कोणत्याही कर्मचाऱ्यास कामावरुन कमी केल्यास नविन कर्मचारी नेमल्यास कार्यालयास सुचीत करावे.

१७) दरप्रक्रिये मध्ये दिलेले जेवणाचे मेनु नुसारच जेवण पुरवण्यात यावे यांची नोंद घेण्यात यावी. शिळे जेवण पुरवल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल तसेच सदर जेवणाचे बील अदा करण्यात येणार नाही.

१८) उपहारगृहात स्वच्छता ठेवण्याची जबाबदारी आहार पुरवठादाराची राहील व उपहारगृह उत्कृष्ठ स्वच्छता राखणे बंधनकारक राहिल.

१९) प्रशिक्षणार्थीना भोजन वाढण्यासाठी पुरवठादारने आपल्या कर्मचारी नेमण्यात यावे. स्वयंपाकासाठी लागणारे साहीत्य, गॅस, उपकरणे, ताट-वाटी, ग्लास, इतर भांडी या कार्यालयाकडून पुरविण्यात येणार नाही.

HEALTH & FAMILY WELFARE TRAINING

२०) पाण्याचा वापर निव्वळ भांडी धुणे, भाजीपाला धुणे, स्वयंपाक करणे स्वयंपाकगृह/ उपहारगृहाची स्वच्छता या साठीच करता येईल. इतर बाबीसाठी पाण्याचा वापर करता येणार नाही.

२१) विजेचा वापर लाईट, पंखे, टि व्ही, वॉटर फिल्टर, वॉटर कुलर, व्हॅक्यूम क्लीनर, किचन मधील मिक्सर इ. साठी करता येईल. याशिवाय विजेवर चालणारी इतर उपकरणे वापरता येणार नाहीत.

२२) उपहारगृहात खादय पदार्थ दर्जा तपासणी रजिष्टर ठेवण्यात यावे व सदरचा रजिष्टर वर या कार्यालयातील अधिकारी व कर्मचा-यांन कडुन दैनंदिन आहार तपासुन रजिष्टर मध्ये अनुकुल/ प्रतिकुल शेरे घेण्यात यावे.

२३) उपहारगृहातील भोजन तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे कच्चा मालाचे हे दर सहामाही जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा नाशिक येथे तपासणी करण्यात यावी व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल कार्यालयास सादर करण्यात यावा.

२४) स्वयंपाकासाठी/ भोजन वाढणेसाठी नेमलेले कर्मचारी निरोगी असावेत. सदर कर्मचाऱ्यांची तीमाही वैद्यकीय तपासणी करुन तसे प्रमाणपत्र या कार्यालयास सादर करावे. तसे न-केल्यास दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल व कामावर असलेल्या कर्मचाऱ्यांना गणवेश पुरविण्यात यावा व पुरेसे कर्मचारी ठेवावेत.

२५) जेवणाचा/ नास्ताचा साप्ताहिक मेनुकार्ड उपहारगृहाच्या दर्शनी भागात लावावा.त्यानुसारच जेवण देण्यात यावे.

२६) नास्ताचा दररोजचा मेनु ठरल्याप्रमाणेच नास्ता प्रशिक्षणार्थीना दिला जाईल यांची दक्षता घ्यावी तसे न झाल्यास त्या दिवसांचा नास्ताचे व जेवणाचे बील अदा केले जाणार नाही.

२७) दररोज सकाळी नास्ता मध्ये पोहे, उपमा, शिरा, वडा सांबर, इडली सांबर, उसळ, उसळपाव इ.नास्ता हा चवदार असावा. यापैकी एक मेनु दिला जावा दररोज सारखाच मेनु दिल्यास नास्ता दिला गेला नाही असे समजण्यात येईल.

२८) नास्ता/जेवण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थीचे सकाळ संध्याकाळची हजेरी उपहारगृहात ठेवावी ज्यांनी नास्ता/जेवण घेतले त्यांचेच बील अदा करण्यात येईल व तसेच बीलावर संबधीत सत्र समन्वयका कडुन प्रमाणीत करुन घ्यावे.

२९) उपहारगृहात स्वच्छता ठेवावी भोजन कक्षात भोजन तयार करण्यासाठी चांगले स्टीलचे भांडे असावेत.

३०) अन्नविषबाधा होऊन शारिरीक/ जिवितहानी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संस्थेच्या ठेकेदारांची राहील.

३१) पुरवठा आदेश प्राप्त झाल्या नंतर ८ दिवसात प्राचार्य, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र नाशिक या नावाने रु.४०,०००/-(अक्षरी- चाळीस हजार रुपये) सुरक्षाठेव रक्कम रकमेचा डिमांड ड्रॉप कार्यालयात जमा करण्यात यावा.

३२) स्वयंपाकगृह/ उपहारगृहाचे नुकसान/ मोडतोड, पुरविलेले फर्निचर, साहीत्य इ.हरविणे/ मोडतोड/ नुकसान इ. उपहारगृह ठेकेदाराकडुन वसुलपात्र राहील व प्रचलित नियमांचे आधारे ते वसुल करण्यात येईल.

३३) उपहारगृहातील कर्मचाऱ्यांनी प्रशिक्षणार्थी / प्रशिक्षक यांचेशी आदराने वागणे अपेक्षित आहे. वागणुकीबाबत प्रशिक्षणार्थी/ प्रशिक्षक यांची तक्रार प्राप्त झाल्यास सदरील कर्मचाऱ्यावर कार्यवाही करण्यात येईल.

३४) खाद्य पदार्थाचा दर्जा समाधानकारक नसल्यास कोणत्याही प्रकारची पुर्वसुचना न देता करार संपुष्टात आणण्याचा अधिकार प्राचार्य यांना राहील.

३५) काही कारणास्तव भोजन सुविधा पुरविणे तुम्हाला शक्य नसल्यास १ महिन्याची आगाऊ सुचना देण्यात यावी.

३६) प्रशिक्षणार्थीचे जेवणाचे देयके प्रशिक्षण संपल्यानंतर ७ दिवसातच्या आत दयावे. देयक अदा करताना नियमानुसार आयकर व जी.एस.टी.कपात करण्यात येईल. देयक सादर करतांना वस्तू व सेवा कर (जी.एस.टी) लावुनच देयक सादर करावे. अनुदानाच्या उपलब्धतेनुसार देयके अदा करण्यात येतील.

३७) उपहारगृहाच्या ड्रेनेज लाईन मध्ये कचरा टाकू नये.ओला कचरा व कोरडा कचरा स्वतंत्र ठेवण्यात यावे व कचऱ्याची विल्हेवाट आपल्या स्तरावरुन करण्यात यावी. कचऱ्याची विल्हेवाट करण्याकामी लागणारे साहित्य (पिशवी व इतर) आपल्या स्तरावरुन पुरवठा करण्यात यावा.

३८) दरपत्रकातील सुचना व दरपत्रक धारकांना पुरविण्यात आलेल्या सर्वसाधारण सुचनांमध्ये नमुद केलेले नियम दरपत्रकधारकांना बंधनकारक राहील.

३९) सर्वात कमी किमंतीची दरपत्रक स्विकारण्यास हे कार्यालय बांधील नाही.

डॉ.दावल श्रीहरी साळवे
प्राचार्य,
आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक

HEALTH & FAMILY WELFARE TRAINING CENTRE NASIK

# भोजन सेवा कामाची व्याप्ती व स्वरुप

**कामाचे स्वरुप -**

१) या कार्यालयातील प्रशिक्षणासाठी येणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांना तीन वेळेस चहा सकाळी नास्ता व दुपारी जेवण व रात्री जेवण पुरविणे बंधनकारक राहील.व इतर वेळेस प्राचार्य, यांचा आदेशानुसार भोजन पुरविणे बंधनकारक राहील.

२) **कंत्राटदाराने कंत्राटी कर्मचाऱ्यांना पुरवावयाच्या सुविधा-**
भोजन कक्षात नेमण्यात आलेल्या सर्व कर्मचाऱ्यास गणवेश व ओळखपत्र पुरविणे बंधनकारक राहील.

**३) कंत्राटदारास (ठेकेदारास) द्यावयाचा मोबदला -**

अ) कंत्राटदारास (ठेकेदारास) भोजनसेवेचा मोबदला अनुदानाच्या उपलब्धतेनुसार देण्यात येईल.
ब) देयक अदा करताना नियमानुसार आयकर (टिडीएस) कपात करण्यात येईल.

**४) भोजन सेवेचे संनियंत्रण -**

खालील सदस्यांची समिती भोजन सेवेची गुणवत्ता पडताळणी करेल.

१) साथरोग शास्त्रज्ञ, आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक
२) व्यवस्थापकीय निर्देशक,आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक
३) प्रशासकीय अधिकारी,आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक
४) कार्यालयीन अधिक्षक,आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक
५) सांख्यिकी अधिकारी आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक
६) वसतीगृह व्यवस्थापक,आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक

या शिवाय उपहार कक्षात तयार करण्यात येणाऱ्या भोजन सेवेची पहाणी अचानकपणे केंव्हाही केली जाईल व त्याबाबतचे अभिप्राय नोंदविले जातील. असामाधानकारक सेवेबाबत लेखी समज देण्यात येईल व भोजनसेवात सुधारणा न झाल्याचे दिसुन आल्यास नियमाप्रमाणे दंड आकारण्यात येईल. कंत्राटदाराच्या सेवा मार्गदर्शक सुचनांच्या अनुषंगाने न आढळल्यास त्या कुठल्याही क्षणी आहार सेवा रद्द करण्यात येतील व अशा परिस्थितीत कंत्राटदाराने भरलेली हमी रक्कम जप्त करण्यात येईल.

HEALTH & FAMILY WELFARE TRAINING CENTRE ★ NASIK ★ सत्यमेव जयते

(डॉ.दावल श्रीहरी साळवे,)
प्राचार्य,
आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक.

## व्यापारी लिफाफा (दैनंदिन आहार सेवा)

| अ. क्र. | तपशिल | उच्चतम दर | जीएसटी सह दर (प्रतीनग) |
|---|---|---|---|
| १ | **चहा (खालील पैकी एक)**<br>चहा/ कॉफी / कमी साखरेचा चहा/ बीनासाखरेचा चहा/ लेमण टी | १० | |
| २ | **नाष्टा (खालील पैकी एक)**<br>एक प्लेट उपमा / शिरा / पोहे,<br>ईडली (४) सांबर अथवा चटणी / मेंदूवडा (२) सांबर अथवा चटणी / डोसा (१) सांवर अथवा चटणी /उत्तपा (१) सांबर अथवा चटणी<br>एक प्लेट मिसळ पाव<br>पावभाजी (२ पाव) / व्हेज पुलाब<br>साबुदाणा वडा दही/चटणी व दोन केळी/इतर फळे किंवा बटाटा चिवडा व दोन केळी /इतर फळे | ४० | |
| ३ | **जेवण (एक वेळचे) प्रकार १**<br>--- गव्हाच्या पोळ्या, एक भाजी , वरण-भात, पापड, लोणचे, सलाड, लिंबु (फुल जेवणात वरील सर्व पदार्थ अमर्यादित असतील) व एक स्वीट. | ७० | |
| ४ | **जेवण (एक वेळचे) प्रकार २**<br>- गव्हाच्या पोळया, दोन भाजी, वरण-भात जिराराईस/ पुलाव, पापड, लोणचे, सलाड, लिंबु, (जेवणात वरील सर्व पदार्थ अमर्यादित असतील) व एक स्वीट. | ९५ | |
| ५ | **जेवण (एक वेळचे) प्रकार ३**<br>- --- गव्हाच्या पोळया / ज्वारी/ बाजरी/ नाचणीची भाकरी, दोन भाज्या, (एक पातळ व एक सुकी, वरण-भात जिराराईस/ पुलाव, दही /ताक/ कोशंबीर, पापड, लोणचे, सलाड, लिंबु, ( जेवणात वरील सर्व पदार्थ अमर्यादित असतील) व श्रीखंड / गुलाबजाम / मोतीचुरलाडू / जिलेबी/ सोनपापडी या पैकी एक स्वीट. | १४५ | |

निविदा धारकाची सही, शिक्का

(डॉ.दावल श्रीहरी साळवे,)
प्राचार्य,
आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक.

## परिशिष्ट- ०१

## टेंडर फॉर्म (दरपत्रक)

HEALTH & FAMILY WELFARE TRAINING CENTRE ★NASIK★

प्रति,

मा.प्राचार्य,

आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केद्र,

नाशिक.

महोदय,

दरपत्रकातील सुचना व कागदपत्रे काळजीपुर्वक वाचल्यानंतर सही करणार आवेदन करतो की,आमच्या भोजन सेवाचे दरपत्रक या अर्जासोबत जोडले आहे आणि आमची स्पर्धात्मक ऑफर ही जी या निविदेचा भाग असुन लिफाफा क्र.२ मध्ये सादर केलेली आहे.

आम्ही वचनबध्द आहोत की,जर आमची दरपत्रक स्विकारली गेली तर दरपत्रकातील अटी व शर्तीना अधिन राहुन परीपुर्ण भोजनसेवा देवु.

जर आमची दरपत्रक स्विकारली गेली तर आम्ही वचनबध्द आहोत की, दरपत्रकातील कागदपत्रामध्ये नमुद केलेली सुरक्षा ठेव रक्कम ठराविक मुदतीत जमा करु.

या दरपत्रकाच्या अधिन राहुन आम्ही बांधील आहोत कि दरपत्रक वैधता कालावधीपुर्वी कदाचित आमची दरपत्रक स्विकारली अथवा नाकारली जावु शकते.

जोपर्यंत आपल्यामध्ये औपचारीक व अंतिम कंत्राट ठरविले जात नाही.तोपर्यत सदर दरपत्रक ही तुमच्या स्विकृतीसाठी विचाराधीन असणार आहे.आणि तुमच्या स्विकृतीसाठी असणाऱ्या अटी व शर्ती हया कंत्राट करारात नमुद करुन त्या आमच्यावर बंधनकारक राहतील.आम्हाला जाणिव आहे की,जी दरपत्रक तुमच्याकडे दाखल होतील. त्यातील सर्वात कमी किमंतीचे दरपत्रक स्विकारण्यास तुम्ही बांधील नाही.

सही :____________________

दिनांक :____________________

दरपत्रकधारकांचे नांवः____________________

दरपत्रक धारकांची सही शिक्का

HEALTH & FAMILY WELFARE TRAINING CENTRE ★NASIK★

## परीशिष्ट - ०२

## तीन वर्षाची वार्षिक उलाढाल तपशिल

मे. ____________________________________________

या संस्थेची आर्थिक स्थिती वार्षिक उलाढाल मागील तीन वर्षासाठी खालीलप्रमाणे नमुद केली असुन ती खरी बरोबर आहे.

| अ.क्र. | वर्ष | उलाढाल रक्कम |
|---|---|---|
| १ | २०२२ - २०२३ | |
| २ | २०२३ - २०२४ | |
| ३ | २०२४ - २०२५ | |

सही ________

लेखापाल / सनदी लेखापाल

नांव ____

HEALTH & FAMILY WELFARE TRAINING CENTRE
★ NASIK ★

# परीशिष्ट क्र.- ३

## मागील पाच वर्षाचा कामाचा अहवाल

सेवा देत असलेल्या संस्थेचे नांव व पत्ता:- ______________________________

______________________________

______________________________

| अ.क्र. | सेवेचे नाव | सेवा घेत असलेल्या संस्थेचे नांव व पत्ता | कालावधी | सेवा घेत असलेल्या संस्थेचे अभिप्राय व अनुभवाचे प्रमाणपत्र |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

दरपत्रक धारकांची सही शिक्का

# परिशिष्ट क्र.४

मा.कार्यकारी दंडाधिकारी सा.तह.......................... जि....................... यांचे समोर

प्रतिज्ञापत्र लिहून देणार..................................................................वय...............

धंदा.........................................................................................................

पत्तः........................................................................................................

मी सत्यप्रतिज्ञेवर प्रतिज्ञापत्र करतो की,

मी वरील पत्यावरचा कायमचा रहिवासी असून, मा.प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक या आरोग्य प्रशिक्षण केंद्रामध्ये आहार सेवा पुरविणे या कामाचे दरपत्रक भरली आहे.

मी शासकीय, निमशासकीय, खाजगी कॉन्ट्रॅक्टर कामे घेतली असुन मी ज्या ठिकाणी काम घेतलेली आहे ती कामे व्यवस्थितरीत्या पुर्ण केलेली आहेत. आज पर्यंत कोणतेही काम अपुरे सोडलेले नाही. त्यामुळे अथवा इतर कारणांमुळे शासनाची कुठल्याही विभागामध्ये माझे/ माझ्या संस्थेचे नाव काळया यादीत नाही ही वस्तुस्थिती खरी व बरोबर आहे. माझेवर फसवणूक, अफारातफर, दंडदोष गुन्हा नोंद नाही तसेच मला कोणत्याही न्यायालयाने कोणत्याही गुन्हयाखाली शिक्षा केलेली नाही.

तांत्रिक लखोटयामधील (लिफाफा क्र.१) निविदेमध्ये प्रसिध्द केले प्रमाणे आवश्यक ती कागदपत्र मी सादर केलेली आहेत. या बाबत कागदपत्रे अपूर्ण अथवा चुकीची असल्यास माझी दरपत्रक नामंजूर करण्यात येईल याची मला कल्पना आहे. या बाबत माझी कोणतीही तक्रार राहणार नाही. व निविदेतील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

सदरचे प्रतिज्ञापत्र हे मी किमान वेतन कायद्याचा भंग करणार नाही तसेच मी किमानवेतन कायद्याचा भंग करणार नाही तसेच मी शासनाच्या कुठल्याही काळया यादीमध्ये समाविष्ट नसल्याबाबत व माझ्यावर कोणत्याही गुन्हा नसल्याबाबत व माझ्यावर कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा नोंद नसलेबाबत प्राचार्य, आरोग्य व कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नाशिक यांचे कार्यालयात हजर करणे कामी केले आहे.

वरील सर्व माहिती खरी व बरोबर असून सत्य आहे. ती खोटी ठरल्यास मी भारतीय दंड संहितेतील कलम १९९, २०० व १९३(२) नुसार होणाऱ्या शिक्षेस व दंडास पात्र राहील म्हणून केले सत्यप्रतिज्ञेवर ॲफिडेव्हिट आज म.................................

दिनांक

HEALTH & FAMILY WELFARE TRAINING CENTRE ★NASIK★

## परीशिष्ट क्रमांक-०५

## दरपत्रक भरणाऱ्या संस्थेची माहीती

१. संस्थेचे नांव/कंपनीचे नांव :________________

२. अधिकृत इसमाची सही व हुददा :________________

३. संपुर्ण पत्ता :________________

४. फोन नंबर/मोबाईल नंबर :________________

५. फॅक्स नंबर :________________

६. ई-मेल :________________

## दरपत्रक भरणाऱ्या संस्थेच्या प्रतिनिधीची माहिती.

१. संपर्क प्रतिनिधीचे नांव :________________

२. हुददा :________________

३. फोन नंबर :________________

४. मोबाईल नंबर :________________

५. ई-मेल :________________

**प्रतिज्ञापन**

१. मी खालील सही करणार प्रमाणित करतो की,या दरपत्रक फॉर्ममधील अटी व शर्ती पाळण्यास बंधनकारक असुन त्यांचे मी पालन करीन.

२. मी नमुद केलेले दर योग्य असुन संपुर्ण ठेका कालावधीत ते माझ्यावर बंधनकारक राहतील.

३. मी/आम्ही कंत्राटदार मा.प्राचार्य,आरोग्य व कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र,नाशिक कार्यालयातील सक्षम अधिकाऱ्यांना अधिकार देतो की,जर मी/आम्ही कंत्राट करारातील अटी व शर्तीचा भंग केला तर मी/आम्ही दिलेली अनामत सुरक्षा रक्कम सदर अधिकारी जप्त करतील.

४. दरपत्रक कागदपत्रे/दरपत्रक करार निर्देशानुसार भोजनसेवा देण्याचे मी/आम्ही वचन देतो.

दरपत्रक धारकाची सही व शिक्का:-

दिनांक - / /

ठिकाण - ________________

हुदद - ________________